# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय मोहपा.

ता.कळमेश्वर,जि.नागपूर

# राष्ट्रीय सेवा योजना

## <u>वार्षिक अहवाल</u>

डॉ. लिलाधर डी. खरपुरिये — डॉ.एम.व्ही.कोल्हे

रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी — प्राचार्य

**2017—2018**

## ➢ आंतरराष्ट्रीय योग दिवस
## २१ जुन २०१७

बॅरिस्टर शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा येथे शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या क्रीडांगणात योगासने व प्राणायम घेण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयातील जेष्ठ सहयोगी प्रा. डॉ. अश्विनी खापरे, प्रा. डॉ. प्रमोद वडते, प्रा. विनोद भालेराव, ग्रंथपाल डॉ. धनंजय देवते, प्रा. लिलाधर खरपुरिये, प्रा. सचिन काळे तसेच कार्यालयाचे मुख्य लिपिक संजय गणोरकर, शुभम वाघ, चैतन्य सुपले,ग्रंथालय परिचर अजय अंजनकर आणि चतुर्थ श्रेणी कर्मचारी प्रदीप बगडे, श्रीमती रजनी गणोरकर व प्रकाश कोकोडे उपस्थित होते.

योग वर्गात सर्वप्रथम योग प्रार्थना म्हणून शरीर संचलनाने सुरुवात झाली. नंतर विविध आसने घेण्यात आली. त्यात प्रामुख्याने ताडासन, वज्रासन, त्रिकोणासन, वृक्षासन, पद्मासन व ओंकार घेण्यात आला. त्यानंतर प्राणायम (अनुलोम विलोम) करून शिथिलासन घेण्यात आले.

क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. श्रीमती अल्का थोडगे यांनी प्रास्ताविक केले व सर्वांकडून योगासने करवून घेतली. याप्रसंगी डॉ. खापरे यांनी आपल्या मार्गदर्शनात चांगले मन व निरोगी जीवन जगण्याकरिता योगाचे महत्व अधोरेखीत केले

शेवटी राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी प्रा. खरपुरिये यांनी सर्वांचे आभार मानले व योग दिवस संपन्न झाला असे घोषित केले.





## ➢ सत्र १ जुलै २०१७

### नामांकन व स्वयंसेवक निवड प्रक्रिया

### वृक्षारोपण

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय मोहपा येथे रा. से. यो. च्या वतीने दि. ०१ जुलै, २०१७ ला सकाळी ९.३० वाजता महाविद्यालयाच्या परीसरात वृक्षरोपण करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांनी याप्रसंगी प्रथम वृक्षरोपण करून कार्यक्रमाची सुरूवात केली. महाविद्यालयाच्या जेष्ठ प्राध्यपिका डॉ. आश्विनी खापरे, डॉ. संजय ठवळे, डॉ. प्रमोद वडते, डॉ. अजीत जाचक, प्रा. विनोद भालेराव तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी श्री संजयराव गणोरकर, श्री अजयराव अंजनकर, श्रीमती रजनी गणोरकर, श्री प्रदिप बगडे, श्री प्रकाश कोकोडे, श्री शुभम वाघ, श्री चेतन सुपले यांनी प्रत्येकी एका वृक्षाचे रोपण केले. यावेळी महाविद्यालयातील रा. से. यो. चे स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

स्वयंसेवकांनी या कार्यक्रमात मोठया उत्साहाने भाग घेवून संकल्प केला की, आम्ही वृक्षलागवडीसोबतच वृक्षाचे संगोपण व संरक्षण सुद्‌धा करू.तसेच वृक्षरोपणाविषयी जनजागृती करण्याचे प्रयत्न करू. तसेच कर्मचारी व रा. से. यो. स्वयंसेवकांना प्रत्येकी एक वृक्ष देवून त्यांच्या संगोपणाची जबाबदारी देण्यात आली. सरते शेवटी रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. एल. डी. खरपुरीये  यांनी सर्वांचे आभार मानले. व स्वयंसेवकांना बिस्किट देवून कार्यक्रमाची सांगता झाली.




## ➢ जागतिक लोकसंख्या दिवस

### मंगळवार  दि.११ जुलै २०१७

जागतिक लोकसंख्या दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयामध्ये लोकसंख्या वाढची कारणमिमांसा या विषयावर आधारित कार्यक्रमाचे आयोजन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.व्हि.कोल्हे होते. त्यांनी वाढती लोकसंख्या हि चिंतेची बाब आहे असे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर खरपुरीये यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. विनोद भालेराव यांनी केलेतर आभार डॉ.धनंजय देवते यांनी मानले.

कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. त्यानंतर चहा,बिस्कीटे देवून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

- **शैक्षणिक सत्रातील रा.से.यो.उपक्रमांचा उद्‌घाटन सोहळा**

मंगळवार दि. १ ऑगस्ट २०१७ ला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत शैक्षणिक सत्र २०१७-२०१८ मधील विविध उपक्रमांचा शुभारंभ प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला रा.से.यो स्वयंसेवकांनी रा.से.यो गीत सादर केले. कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर खरपूरीये यांनी मागील सत्रातील संकल्प व अंमलबजावणी या विषयी तसेच चालू शैक्षणिक सत्रात नियोजित विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.व्ही.कोल्हे यांनी अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयीन युवकात राष्ट्रसंतांचे विचार रूजविण्याचे महत्वाचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत होत आहे. नवराष्ट्र निर्मितीच्या या चळवळीत युवक युवतींनी सक्रीय योगदानदेण्याची गरज आहे. तसेच देशात श्रमसंस्काराचा विचार खऱ्या अर्थाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी रूजविला. नागपूर विद्यापीठात राष्ट्रसंतांचे व संत गाडगेबाबांचे विचार पुढे नेण्याचे कार्य सन १९७१ पासून राष्ट्रीय सेवा योजनेव्दारे होत आहे. श्रमसंस्कार, ग्रामस्वच्छता, शिस्त, ग्रामीण नेतृत्व गुणांचा विकास हीच राष्ट्रीय सेवा योजनेची वैशिष्टये आहे असे ते म्हणाले. डॉ. प्रमोद वडते यांनी विद्यापीठामध्ये आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नावलौकिक मिळवावे असे आव्हान केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. ए.ए.खापरे, डॉ.ए.आर जाचक, प्रा.विनोद भालेराव, डॉ.ए.ए.थोडगे व शिक्षकेत्तर कर्मचारी श्री.संजय गणोरकर उपस्थित होते. उद्‌घाटन सोहळयाचे संचालन प्रा. सचिन काळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. सुविधा गहूकर यांनी मानले.

- **आठवडी शिबिर:-**

**१४ ऑगस्ट २०१७**

सेमवार दि. १४ ऑगस्ट २०१७ रा.से.यो पथकाव्दारे महाविद्यालय परिसरात सकाळी ८.०० ते ११.०० दरम्यान स्वयंसेवकांनी परिसर साफसफाई मोहिमराबविली. तसेच रस्त्याच्या बाजूला वाढलेल्या गाजर गवत निर्मूलन करण्यात आले. स्वच्छता मोहिम संपल्यानंतर सर्वांना चहा व अल्पोपहार देण्यात आला. या अभियानात स्वयंसेवकाची उपस्थिती वाखानण्याजोगी होती.

 

- **स्वातंत्र दिन**

**१५ ऑगस्ट २०१७**

मंगळवार दि.१५ ऑगस्ट ला महाविद्यालयाचे ध्वजारोहण मोहपा शिक्षण मंडळाचे सदस्य् मा.तेजराजजी नाखले यांच्या हस्ते सकाळी ७.३० वाजता करण्यात आले. याप्रसंगी मोहपा शिक्षण मंडळाचे सदस्य भाऊरावजी सुपले, प्राचार्य डॉ.एम.व्ही.कोल्हे, रेखडे विद्यालय पिपळा(किनखेडे)चे माजी मुख्याध्यापक श्री.वा.पां.देवते, रा.से.यो कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर डी.खरपुरिये, डॉ. अश्विनी खापरे, डॉ.संजय ठवळे, प्रा.डॉ.प्रमोद वडते, डॉ.अजित जाचक, डॉ.धनंजय देवते व महाविद्यालयाचे शिक्षकेत्तर कर्मचारी श्री.संजय गणोरकर व इतर प्रामुख्याने उपस्थित होते आणि महाविद्यालयीन विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना बिस्किटचे वाटप करण्यात आले. या स्वातंत्र दिनाच्या कार्यक्रमाकरिता रा.से.यो.स्वयंसेवक व कार्यक्रम आधिकारींनी अथक प्रयत्न केले.

 

## सद्भावना दिन सप्ताह

### २० ऑगस्ट २०१७

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा येथे दि. २६ ऑगस्ट २०१७ रोजी सद्भावना सप्ताहानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भारताचे दिवंगत माजी पंतप्रधान श्री राजीव गांधीं यांचा जन्म २० ऑगस्ट १९४४ ला झाला. राजीव गांधींना शांतीदूत म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या निधनानंतर त्यांचा जन्मदिवस हा सद्भावना दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष महाविद्यालयाच्या जेष्ठ प्राध्यापक डॉ. अश्विनी खापरे होत्या. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून स्व. श्री राजीव गांधी यांचा जीवनपट उलगडून

दाखविला. तर प्रमुख अतिथी शैक्षणिक कीर्तनकार श्री. वसंतदास कुंभारे हे होते. त्यांनी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून तरूणांनी वाचनाची सवय लावल्यास त्यांचे वैचारिक जीवन प्रगल्भ होईल. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक समाजातील वाईट रूढी, परंपरा मोडून काढू शकतो, असा समाज प्रबोधनात्मक संदेश आपल्या कीर्तनातून दिला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा. से. यो. अधिकारी डॉ. लिलाधर खरपुरिये यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. विनोद भालेराव यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ. धनंजय देवते यांनी केले.





- **शिक्षक दिन**

**५ सप्टेंबर २०१७**

मंगळवार दि. ५ सप्टेंबर २०१७ ला महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचेअध्यक्ष प्राचार्य डॉ.एम.व्ही.कोल्ह होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्रा.डॉ.प्रमोद वडते, प्रा.डॉ.अश्विनी ए. खापरे, प्रा.डॉ.अजित जाचक प्रा.विनोद भालेराव, डॉ.धनंजय देवते, डॉ.अल्का थोडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिक्षक दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामधून रा.से.यो. कार्यक्रम आधिकारी डॉ. लिलाधर खरपुरिये यांनी शिक्षकदिनाचे महत्व विशद केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.एम.व्ही.कोल्हे यांनी बदलत्या काळात शिक्षकांसमोरील आव्हाने या विषयावर आपले विचार व्यक्त केले. प्रा.कु. सुविधा गहुकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. स्वयंसेवीका कु. आचल श्रोते यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता कु. डुलेश्वरी वैष्णव,कु.चित्रा काळे, रोशन मानमोडे, किरण बोडखे, माधुरी राऊत, शितल होटे, इत्यादी स्वयंसेवक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमानंतरस्वयंसेवकांना केळी, अल्पोहार आणि चहा देण्यात आला.




## ➢ आठवडी शिबिर

### रविवार दि. १० सप्टेंबर २०१७

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने मोहगाव पासून तर महाविद्यालया पर्यंतचा रस्ता साफ केला गेला. त्यामध्ये गाजर गवत निर्मूलन, प्लास्टीक कचरा एकत्र करणे, इत्यादी करिता मोहिम राबविण्यात आली. यामध्ये ८५ स्वयंसेविका व १५ स्वयंसेवक यांनी सहभाग घेतला होता. रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. एल.डी. खरपुरिये सोबत मोहगाव येथील नागरिकांनी सुध्दा या स्वच्छता मोहिमेमध्ये सहभागघेतला.

नंतर स्वयंसेवकांना बिस्किट देण्यात आले.




## ➢ राष्ट्रीय सेवा योजना दिन

### दि.२४ सप्टेंबर २०१७

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा येथे दि. २४ सप्टेंबर २०१७ ला राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला. या दिनानिमित्य कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्ये डॉ. एम. व्ही. कोल्हे होते. त्यांनी अध्यक्षिय भाषणात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये काम करण्याची मानसिकताच राहीलेली नाही. तेव्हा रा. से. यो स्वयंसेवकांनी कामाची लाज बाळगू नये. ज्याप्रमाणे आई बाळाला संस्कार शिकविते व वेळ पडल्यास कठोर सुध्दा होते, तसे रा. से. यो. कार्यक्रम अधिका-यांनी वेळप्रसंगी कठोर भूमिका घेवून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त निर्माण करावी. असे मत विशद केले. तसेच कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. ए. ए. खापरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासात रा. से. यो. ची काय भूमिका होती याचा इतिहास उलगडून दाखविला.

याप्रसंगी महाविद्यालयाचे जेष्ठ प्राध्यापक डॉ. प्रमोद वडते यांनी त्यांच्या काळातील विशेष शिबिरातील अनुभव कथन केले. त्यावेळेस विद्यार्थ्यांमध्ये जो उत्साह होता तो अलिकडे पहायला मिळत नाही. असे मत व्यक्त केले. प्रा. भालेराव सर यांनी संत गाडगे बाबा यांचे स्वच्छतेविषयी असलेली धडपड व गाडगेबाबांनी समाजाला दिलेला संदेश याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रा. से. यो. सहकार्यक्रम अधिकारी डॉ. डी. डब्ल्यू. देवते यांनी नियत आणि नीती चांगल्या ठेवल्यास सेवाभाव चांगला घडून येतो. या करीता रा. से. यो. स्वयंसेवकांनी चांगला सेवाभाव ठेवावा. असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर खरपुरीये यांनी केले. प्रास्ताविकपर भाषणात त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना व उद्दिष्ये यांचा वर्तमान सामाजिक प्रश्नांशी सबंध जोडून रा. से. यो. स्वयंसेवक या संदर्भात समाजात जागृती निर्माण करू शकतात. याकरीता स्वयंसेवकांनी मोठया हुरहुरीने कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हायला पाहीजे. असे विचार प्रगट केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. कु. सुविधा गहुकर यांनी केले तर आभार प्रदर्शन बी. ए. भाग ३ ची विद्यार्थिनी डुलेश्वरी वैष्णव हिने केले. कार्यक्रमाला बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षक व शिक्षेत्तर कर्मचा-यानी प्रयत्न केले.





- **आठवडी शिबिर**

**रविवार दि. १ ऑक्टोबर २०१७**

रासेयो पथकाव्दारे १ ऑक्टोबर २०१७ रोजी सकाळी ८.०० ते ११.०० वाजेपर्यंत महाविद्यालय परिसर स्वच्छता आठवडी शिबिराचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या परिसरामध्ये ८० स्वयं सेवकांनी गाजर गवताचे व इतर साफसफाईचे काम पूर्ण केले. सकाळी ११ वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात स्वयंसेवकांना एकत्र करून गीतगायनानीं शिबीराची सांगता झाली.




## महात्मा गांधी जयंती व जागतिक अहिंसा दिवस

### सोमवार दि. २ ऑक्टोंबर २०१७

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा येथे गांधी जयंती निमित्ताने तसेच जागतिक अहिंसा दिवसाचे औचित्य साधून रा.से.यो स्वयंसेवकांनी महाविद्यालयीन व सभोवतालच्या परिसरात स्वच्छता अभियान  राबविले. या स्वच्छता अभियानात महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहभाग घेतला. तसेच स्वच्छतेची शपथ घेवून गावतील व आपल्या शेजारी लोकांमध्ये स्वच्छतेविषयी जागृती निर्माण करण्याचा निर्धार केला. या अभियानात महाविद्यालयाच्या सर्वच विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शेवटी रा. से. यो. स्वयंसेवकांत बिस्किटाचे वाटप करून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या राष्ट्रवंदनेने  या अभियानाची सांगता करण्यात आली.







## ➢ आठवडी शिबिर :-

### रविवार दि. १५आक्टोंबर २०१७

रविवार दि १५ आक्टोंबर २०१७ रोजी सकाळी ८ ते १० वाजेपर्यंत खुमारी येथे ग्रामस्वच्छतेसाठी आठवडी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात ९५ रा.से.यो स्वयेसंवकांनी सहभाग घेतला होता.

खुमारीयेथील सरपंच श्री.ठाकरे यांनी स्वयंसेवकांचे आभार मानले. शेवटी चहा नाश्ता देवून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



## ➢ संविधान दिन

### रविवार दि. २६ नोव्हेंबर २०१७

मोहपा एज्युकेशन सोसायटीद्वारे संचालित बॅरिस्टर शेषराव वानखेडे महाविद्यालयात २६ नोव्हेंबर, २०१७ रोजी संविधान दिनानिमित्त एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

भारताच्या संविधानाबाबत विद्यार्थ्यांना माहिती व्हावी. संविधानामुळे भारतात शासकीय, न्यायीक व्यवस्था निर्माण झाल्या, अशा संविधानाची ओळख सर्वांना व्हावी, या उद्देशाने महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभाग व रा. से.यो. यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली एका कार्यक्रमाचे आयोजन केले. कोणत्याही देशाचे संविधान त्या देशाच्या सामाजिक रूढी, परंपरा व प्रथा आदींची एक चौकट असते. या चौकटीतून देशाच्या एकूण परिस्थितीचे प्रतिबिंब उमटते, असे मत प्राचार्य डॉ. कोल्हे यांनी यावेळी व्यक्त केले.

राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. अश्विनी खापरे यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन विद्यार्थ्यांकडून करवून घेतल्यानंतर या उद्देशपत्रिकेतील मुलभूत तत्वांचा अर्थ स्पष्ट केला. २६ नोव्हेंबर,१९४९ रोजी भारताचे संविधान जनतेला अर्पण करण्यात आले. जगातील सर्वांत मोठी आणि बळकट लोकशाही व्यवस्था भारतात आहे. म्हणून प्रत्येक सुजाण नागरिकाने भारताच्या संविधानाची किमान उद्देशिकातरी समजून घेणे गरजेचे आहे, असे विचार त्यांनी व्यक्त केले. संविधान निर्मितीचा इतिहास उलगडत संविधान दिनाचे औचित्य रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. खरपुरिये यांनी विशद केले.

कु. किरणबोडखे हिने कार्यक्रमाचे संचालन केले. प्रा.सुविधा गहुकर हिने आभार मानले. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची भरगच्च उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. डॉ. प्रमोद वडते, प्रा. डॉ. अल्का थोडगे, प्रा. सचिनकाळेयांचेसह सर्व अधिव्याख्याता आणि संजय गणोरकर, रजनी अकर्ते, अजय अंजनकर, शुभम वाघ, चैतन्य सुपलेआदी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.




## ➢ जागतीक एड्स विरोधी दिवस

### दि. १ डिसेंबर २०१७

शुक्रवार दि. १ डिसेंबर २०१७ ला महाविद्यालयात रा.से.यो विभागतर्फे जागतिक एड्स दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.एम.व्ही.कोल्हे होते. प्रमुख पाहुण्या डॉ.अलकाथोडगे यांची उपस्थित होत्या.

डॉ.थोडगे यांनी एड्स म्हणजे काय? त्याचा प्रादुर्भाव कसा होतो? त्याला आळा घालण्यासाठी कोणत्या उपाययोजना आहेत, यावर विद्यार्थ्यासोबत चर्चा करण्यात आली. रा.से.यो. स्वयंसेवकांनी यावर प्रश्नसुध्दा उपस्थित केले.

रा.से.यो अधिकारी डॉ.लिलाधर खरपुरिये यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. याप्रसंगी डॉ.जाचक, डॉ.देवते व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.सूत्रसंचालन कु.चित्राकाळे हिने केले तर प्रा.सुविधा गहूकर यांनी आभार मानले.

## ➢ आठवडी शिबिर

### रविवार दि. १० डिसेंबर २०१७

रविवार दि.१० डिसेंबर २०१७ ला रा.से.यो. विभागातर्फे मोहपा येथील गळबडी मध्ये साफसफाईचे काम करण्यात आले. तेथील नाल्यावर रस्ते तयार करण्यात आले. नगरसेवकांनी रा.से.योच्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले व भविष्यात आदर्श नागरिक म्हणून नावलौकिक कराल असा विद्यार्थ्याच्या संदर्भात आशावाद व्यक्त केला. या शिबीरात १०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर खरपुरिये यांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले.

- ## स्वच्छ भारत पंधरवाडा

### दि. ०२ जानेवारी ते १६ जानेवारी, २०१८

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय मोहपा येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. ०२ जानेवारी २०१८ ते १६ जानेवार, २०१८ पर्यंत महाविद्यालयाच्यावतीने स्वच्छ भारत पंधरवाडा साजरा करण्यात आला. या पंधरवाडयात रा.से. यो. पथकाच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालयाचे पडीत,जागेवरिल, गाजरगवत, बाभूळ व काडीकचरा व दगडांनी भरून पडलेल्या मैदानाची स्वच्छता केली. आज हे मैदान विद्यार्थांना खेळण्यायोग्य झाले आहे. आता या मैदानावर महाविद्यालयीन स्तरावरच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. तसेच महाविद्यालयाच्या सभोवतालच्या मुख्य रस्त्यांवरील गाजरगवत कापून रोडची दोन्ही बाजू स्वच्छ करण्यात आली आहे. तसेच महाविद्यालयाच्या मागच्या बाजूला असलेला मोहपा नगरपालीकेचा डंपींग यार्डच्या रोडची सुद्‌धा साफ सफाई करण्यात आली आहे. या स्वच्छता अभियानाकरिता रा.से.यो. स्वयंसेवकांनी खुप मोठे परिश्रम घेतले आहे. या कार्यक्रमाकरीता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांनी स्वयंसेवकांना नेहमी प्रोत्साहीत केले. ते नेहमी म्हणायचे की,'कामाची किंमत होते, कोणतेही काम लहान किंवा मोठे नसते'. म्हणून स्वयंसेवक हा स्वता:साठी नाही तर समाजासाठी झटत असतो. तेव्हा विद्यार्थांनी अशी कामे करायलाच पाहीजे. तसेच स्वच्छ भारत पंधरवाडा या कार्यक्रमात महाविद्यालयातील प्रा. डॉ.ए.ए. खापरे, डॉ. ठवळे, डॉ. वडते, डॉ. जाचक, प्रा. भालेराव,डॉ. थोडगे व शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. संजय गणोरकर, श्री. अजय अंजनकर, श्री प्रदीप बगडे, श्री प्रकाश काकोडे, सौ. रजनी अकर्ते , शुभम वाघ, चैतन्य सुपले या सर्वांनी सहकार्य केले. रा. से यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर खरपुरीये यांनी अथक परिश्रम घेतले.

- ## राष्ट्रीय युवा दिन

### दि. १२ जानेवारी २०१८

महाविद्यालयात दि. १२ जानेवारी ला स्वामी विवेकानंद यांचा जन्म दिन राष्ट्रीय युवादिन म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.व्ही. कोल्हे होते. तर प्रमुख पाहुण्या प्रा. डॉ.अश्विनी खापरे हया होत्या. प्रमुख वक्ते डॉ.अजित जाचक व प्रा.विनोद भालेराव होते. सर्वच पाहुण्यांनी स्वामी विवेकानंदाच्या विचारांची जगाला गरज आहे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.एम. व्हि. कोल्हे यांनी विवेकानंदांचे हिंदु संस्कृति व मानवतेविषयी विचार यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर खरपुरिये यांनी केले. याप्रसंगी प्रा.डॉ.प्रमोद वडते, डॉ.अलका थोडगे, प्रा. सुविधा गहूकर व शिक्षेकेतर कर्मचारी श्री.संजय गणोरकर, हरिश अंजनकर, प्रदिप बगडे, प्रकाश कोकोडे, रजनी

गणोरकर, शुभम वाघ, चेतन सुपले उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रा. सचिन काळे यांनी केले. तर आभार डॉ.धनंजय देवते यांनी मानले. या कार्यक्रमाला बहुसंख्या विद्यार्थी उपस्थित होते.




- **आठवडी शिबिर**

**रविवार दि २१ जानेवारी २०१८**

रविवार दि. २१ जानेवरी २०१८ ला मोहपा नगर परिषद येथील गावातील मुख्य रस्ते व आजुबाजूचा परिसर गाजर गवताने वेढलेला होता. प्रजासत्ताक दिन या ठिकाणी उत्साहात साजरा होत असतो. मोहपा येथील सर्व शाळा प्रजासत्ता दिनानिमित्त येथे एकत्र सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करतात. रा.से.यो. स्वयंसेवकांनी हा संपूर्ण परिसर साफ केले. नगर परिषदेचे शिक्षक सभापती नगरसेवक यांनी रा.से.यो.च्या विद्यार्थ्यांचे गोडकौतुक केले. त्यानंतर चहा व बिस्किटं देण्यात आले.

- **प्रजासत्ताक दिन**

**दि.२६ जानेवारी २०१८**

शुक्रवार दि. २६ जानेवारी २०१८ ला मोहपा शिक्षण मंडळाचे सदस्य श्री.तेजरामजी नाखले यांच्या हस्ते सकाळी ७.३० वाजता ध्वजारोहण झाले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.व्ही. कोल्हे तसेच रेखडे विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक श्री.वा.पा. देवते, श्री.भाऊरावजी सुपले, व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. ध्वजारोहण झाल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये बिस्किटचे वाटप करण्यात आले.

- **आठवडी शिबिर**

**रविवार दि. ४ फेब्रुवारी २०१८**

रविवार दि. ४ फेब्रुवारी २०१८ आठवडी शिबिराचा शेवट असल्यामुळे रा.से.यो. विभागातर्फे महाविद्यालयाच्या परिसरात श्रमदान करून वार्षिक रा.से.यो. शिबिराची सांगता करण्यात आली. महाविद्यालयाचे प्रा.डॉ. प्रमोद वडते यांनी स्वयंसेवकांनी वर्षभरात केलेल्या कामाची प्रशंसा केली. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य

डॉ.एम.व्ही.कोल्हे यांनी रा.से.यो. च्या विद्यार्थ्यांनी शिस्तबध्द राहून अतिशय योग्यरित्या काम केल्याबद्दल कौतुक केले.

यावेळी उपस्थित असलेले प्रा.डॉ. खापरे, प्रा.डॉ. ठवळे, प्रा.डॉ.वडते, प्रा.डॉ. जाचक, डॉ. देवते, प्रा. भालेराव, डॉ.थोडगे. प्रा.काळे, प्रा.कु. गहुकर, श्री.संजय गणोरकर, प्रदीप बगडे हरिष अंजनकर यांचे रा.से.यो कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर खरपुरिये यांनी आभार मानले.

- **रस्ते सुरक्षा अभियान**

बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा येथे दि. २७ जानेवारी २०१८ रोजी रस्ते सुरक्षा जागृती अभियान अंतर्गत कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ प्राध्यापिका डॉ. ए. ए. खापरे. तर प्रमुख पाहुणे प्रा. विनोद भालेराव होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. प्रमोद वडते, डॉ. अजित जाचक, डॉ. धनंजय देवते, डॉ. अल्का थोडगे उपस्थित होते. रा. से यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर खरपुरीये यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेतून रस्ते हे विकासाचे द्योतक आहे. तेव्हा रस्त्यावरून वाहतूक करतांना जबाबदारीने करावी. असे विचार व्यक्त केले. तर डॉ. जाचक यांनी वाहतूक करित असतांना आपल्या जिवाबरोबर दुसऱ्यांच्याही जिवाचा विचार करावा. तरूण पणात असलेला उंमाद सोडून द्यावे असे मत विशद केले. तर प्रमुख पाहुने प्रा विनोद भालेराव यांनी विद्यार्थ्यानी वाहतुकीच्या नियमाचे पालन करावे. व समाजात या विषयी जागृकता निर्माण करावी असे सुचविले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. खापरे यांनी नशाकरूण वाहन चालवू नका या मुळे कुटूंबाची हानी होते असे विचार विशद केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. संजय गणोरकर, हरिश अंजनकर, प्रदिप बगडे,प्रकाश कोकोडे, रजनी अकर्ते यांनी सहकार्य केले.




➢ **दि. १४ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी २०१८ रा. से. यो. विषेश शिबीर**



डॉ.लिलाधर डी.खरपुरिये

रा.से.यो कार्यक्रम अधिकारी

डॉ.एम.व्ही कोल्हे

प्राचार्य

बॅरि.शेषराव वानखेडे महाविद्यालय मोहपा

लोकमत

## बॅरि. वानखेडे महाविद्यालयात व्याख्यान





## रस्ते सुरक्षा जागृती अभियान

तालुका वार्ताहर / कळमेश्वर

येथील बॅरिस्टर शेषराव वानखेडे महाविद्यालयात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये रस्ते सुरक्षिततेबाबत माहिती व्हावी म्हणून रस्ते सुरक्षा जनजागृती अभियान घेण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. ए. ए. खापरे तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक विनोद मालोराव, डॉ. अजित जाचक, डॉ. प्रमोद वडते उपस्थित होते.

रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. दिलराज खडसे यांनी आपल्या प्रास्ताविकातून रस्ते हे विकासाचे द्योतक आहे. तेव्हा रस्त्यावरून वाहतूक करताना ती व्यवस्थित आणि जबाबदारीने करावी, याबद्दल विचार व्यक्त केले. आयोजनासाठी डॉ. धनंजय देवते, डॉ. अलका भोडगे, शिक्षकेतर कर्मचारी संजय गणोरकर, हरीश अंजनकर, शुभम वाघ, गौतम सुरजुसे, प्रकाश कोकाटे, प्रदीप बनकर, रजनी ठाकरे यांनी सहकार्य केले.

## वानखेडे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन



## बॅरि .शेषराव वानखेडे महाविद्यालय

